# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/10/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. भिवापूर**:— अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा तास येथे दिनांक २५/१०/२०२३ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गोपाल भाउराव भिंगारे वय ४६ वर्षे रा. वार्ड क्र ०५ गुरूदेव वार्ड भिवापूर ता. भिवापुर जि. नागपुर हा प्रासेसीग फाउंडेषन क्लस्टर कंपनीमध्ये संचालक म्हणुन काम पाहतो. माहे/२३ पासुन प्रोसेसींग फाउंडेषन क्लस्टर भिवापुरतर्फे एमएआयडीसी परीसरात प्लाट न. पी.३ येथे कारखान्यात बांधकाम सुरू आहे. सदर बांधकामासाठी सिमेंट विटा व लोखंडी सळाखी आणल्या होत्या. फिर्यादी हा घरी हजर असता बांधकाम करणारा ठेकेदार नामे नरेश धनविजय रा. धर्मापुर हा कंपनीत गेला असता त्याला बांधकामा साठी आणलेला माल दिसला नाही. तेव्हा त्याने फिर्यादी याला फोन केले फिर्यादी याने कंपनीत जावुन सीसीटीवी कॅमेरा चेक केला तेव्हा फिर्यादी याला बादल मेश्राम व त्याच्यासोबत एक अनोळखी इसम कामासाठी आणलेले १.८ एम.एम.ची एक सळाख बार अंदाजे १० किलो वजनाची किंमती ६००/—रू. २.१६ एम.एम.ची एक सळाख बार अंदाजे २० किलो वजनाची किंमती १२००/—रू. असे एकुण १८००/— रू चा माल चोरून नेताना दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रविन जाधव पोस्टे भिवापूर मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर